# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


**शुद्धीपत्र :**
**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादित :**
**दि. १०.०६.२०१९ पर्यंत**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/2219
दिनांक : 06 JUN 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
पुणे जिल्हयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय /
अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तंत्रशिक्षण संस्था.

**विषय :- ३३ कोटी वृक्ष लागवड २०१९ बाबत...**

संदर्भ :- १. महसूल व वन विभागाचे पत्र क्रमांक : साबवि/-२०१८/प्र.क्र./१४४/फ-११, दि. ०६/०९/२०१८.
२. महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र.सावधि-२०१८/प्र.क्र.१११/फ-११, मुंबई-३२, दि. २०.०५.२०१९
३. विभागीय आयुक्त कार्यालय, रोयो शाखा, विधान भवन, पुणे यांचे पत्र क्र.रोहयो/वृक्ष लागवड/७१/२०१९, दिनांक २९.०५.२०१९.
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/२१४५, दि. ३०.०५.२०१९
५. दि. ०३.०६.२०१९ रोजी, ३३ कोटी वृक्ष लागवड बाबत मा.मंत्री (वित्त,नियोजन आणि वने) यांच्या अध्यक्षतेखाली, मुख्य सभागृह विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे-१ या ठिकाणी झालेली आढावा बैठक.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१९ करीता, तंत्र शिक्षण विभागास **(पुणे जिल्हयासाठी एकूण ५०० रोपे, सातारा जिल्हासाठी ६०२५ रोपे, सांगली जिल्हयासाठी १६०७५ रोपे, सोलापूर जिल्हासाठी एकूण ८९२५ रोपे, व कोल्हापूर जिल्हासाठी १९८२५ इतकी रोपे)** वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले असल्याचे व त्याअनुषंगाने वृक्ष लागवड करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याविषयी या कार्यालयाने वरील संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये, आपणास यापूर्वी कळविण्यात आलेले आहे.

**तथापि दिनांक ०३.०६.२०१९ रोजी, मा. मंत्री, वित्त, नियोजन व वने यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मा. मंत्री महोदयांनी, पुणे जिल्हयाकरीता दिलेले केवळ ५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट खूप कमी असल्याने, पुणे जिल्हयातील सर्व संस्थांनी प्रत्येकी ५० वृक्ष लागवड करावी असे सुधारीत निर्देश दिलेले आहेत.**

पुढील पानावर...

त्यास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या पुणे जिल्हयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थाना, सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे संस्थानिहाय कमीतकमी ५० वृक्षलागवडीचे सुधारीत उद्दिष्ट नेमून देण्यात येत आहे. सदर उपक्रम महाराष्ट्र शासनाचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प असून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सर्व संस्थांनी दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा जास्त वृक्ष लागवड करणे अपेक्षित आहे. तरी पुणे जिल्हयातील सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, दिनांक १०.०६.२०१९ पर्यंत वृक्ष लागवड करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी

**त्यानुसार सदर रोपे लागवडीसाठी आवश्यक खड्डे खोदून त्याचा अहवाल सोबत जोडलेल्या विहित प्रपत्र-२ मध्ये भरुन तसेच खोदलेल्या खड्डयांचे प्रत्येक साईटचे फोटो व १० सेकंदाचा व्हिडिओ संबंधित कार्यालयाच्या खाली नमूद केलेल्या ई-मेल आयडी वर तसेच या कार्यालयाच्या ई-मेल आयडी info.ropune@gmail.com वर Soft Copy व PDF मध्ये दिनांक १०.०६.२०१९ पर्यंत न चुकता पाठवावा.**

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | ई-मेल आयडी | दूरध्वनी क्रमाक |
|---|---|---|---|
| १. | पुणे | dydirsfdpune@gmail.com | ०२०-२४३३३११९ |

तरी वृक्ष लागवड करण्याबाबतची माहिती उपरोक्त ई-मेल आयडीवर न चुकता पाठविणेबाबत पुनःश्च एकदा सूचित करण्यात येत आहे. तरी सर्व संस्थाप्रमुखांनी याची गांभिर्याने नोंद घेवून उचित कार्यवाही करावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : पुणे जिल्हयातील संस्थांची यादी.

प्रत :
१. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, रोहयो शाखा, विधानभवन, पुणे-४११ ००१.
२. मा. सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड अधिकारी तथा उपवनसंरक्षक, वन विभाग पुणे, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.